International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# केवळ सुख –शांती नांदून हे विश्व एक घर व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करणाऱ्या ‘अपेक्षा’ कवितासंग्रहाचा चिकित्सक अभ्यास

प्रा. अभय सुभाष जोशी

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख, गो.सी.गावंडे महाविदयालय, उमरखेड, जि. यवतमाळ

प्रस्तावना :-

साहित्य चळवळींचे केंद्र असणाऱ्या महानगरांपासून दूर वऱ्हाडचे एक टोक असणाऱ्या उमरखेडसारख्या दूरस्थ गावात राहून व्रतस्थपणे साहित्यनिर्मिती करणारे, परंतु दुर्लक्षित कवी म्हणजे ज्ञानदास काळे. काळे गुरुजी अशी ओळख असणारे, व्यवसाय म्हणून शिक्षकाची नोकरी करताना विदयार्थी घडवतानाच समाजातील एक जबाबदार घटक म्हणून त्यांनी काव्यनिर्मिती करताना एक व्रत म्हणून शिक्षक आणि कवी या दोन्हीही भूमिका साकारताना समाजाची सेवा केली. प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरी करताना फुलांसारख्या लहान मुलांना घडविले आणि न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मानवतावादी आधुनिक सुंदर मूल्यांना समाजात रूजविण्यासाठी कवितांच्या माध्यमातून समाजसेवा करण्यासाठी आपली लेखणी झिजवली. याचसंदर्भात आपल्या पहिल्या, एकमेव ‘अपेक्षा’ कवितासंग्रहात मनोगतातून ते लिहितात, “दया, माया, प्रेम, शांती यांच्या चिता जाळल्या जात आहेत. समता, बंधुता, अखंडता, एकात्मता रिमोट कंट्रोलच्या साह्याने बॉंबस्फोट उडवून ठिकऱ्या ठिकऱ्या करून व विद्रुप करून मातीत मिसळवीत आहेत. शांतता नष्ट होत आहे. सुख लोपलं आहे. विषमता बोकाळत आहे. धास्ती वाटत आहे. सारविचाराचा समझोता हवा आहे. सुख शांतीचे नांदणारे हे विश्वची सारे एक घर हवंय ही अपेक्षा !’[1] एकूणच हे मनोगत व्यक्त करतानाच त्यांनी आपले शल्यही मांडले आहे. समाजात विषमता ठायी ठायी दिसून येते, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली आहे. समाजात माणुसकीचा अभाव त्यांना दिसून येतो. समाजात भेदभाव वाढला आहे, हेही त्यांनी स्पष्टपणे अधोरेखित केले आहे. यासाठी समाजात सर्वत्र शांती नांदण्यासाठी प्रयत्न करण्याची ‘अपेक्षा’ ते व्यक्त करतात. ज्ञानदास काळे गुरूजींच्या ‘अपेक्षा’ या कवितासंग्रहाला साहित्याचे गाढे अभ्यासक प्रा.रा.कृ. कुलकर्णी यांची प्रस्तावना लाभली आहे. ते लिहितात, “ श्री. काळे गुरूजी प्रतिकूल परिस्थितीतून आपल्या कवितांना आकार देतात. प्राथमिक शाळेतील एका शिक्षकाने आपले कविमन जोपासले ही अतिशय समाधानाची गोष्ट वाटते. अज्ञानाकडून ज्ञानाकडे नेणारा शेवटी शिक्षकच असतो”[2] ‘अपेक्षा’ या कवितासंग्रहातून कवीच्या लेखणीची धार आणि त्यांची वेदना आपल्याला सहजच जाणवते. प्रसिदध साहित्यिक प्रा. दत्ता भगत यांचे ‘अपेक्षा’ कवितासंग्रहावरील भाष्य अत्यंत महत्त्वाचे असून कवीच्या लेखणीचा यथोचित गौरव करणारे आहे, “अतिशय प्रतिकूल परिस्थितीतही जगण्याची चिवट जिद्द व्यक्त करणारी ज्ञानदास काळे यांची कविता सर्वसामान्य वाचकाला दिलासा देणारी आहे”[3]

ज्ञानदास काळे यांच्या ‘अपेक्षा’ कवितासंग्रहातील निवडक कवितांचा चिकित्सक अभ्यास :-

'ही सृष्टीच आपल्यासाठी वरदान ठरली आहे,'[4] असे मानणारे कवी ज्ञानदास काळे यांची या कवितासंग्रहातील 'आम्ही सारे एक' ही अतिशय सुंदर कविता भारतमातेचे महन्मंगल स्तोत्र गाणारी आहे. मुळातून वाचावी इतकी अप्रतिम साकारली आहे.

आम्ही सारे एक आमचा प्यारा भारत देश
या देशाची शान राखण्या दु:ख झेलू अनेक (पृ. 9)

या देशात राहणारे आम्ही असंख्य बांधव असून आमची भारतमाता एक आहे, इथे दुष्ट भावनेला थारा नसून आम्ही सर्व एक विचाराने राहतो. भारत मातेकरिता आम्ही आमचे प्राण पणाला लावू.

पाईक आम्ही सुखशांतीचे अहिंसा आमचा धर्म
त्यागाची ना तमा शत्रूचा मोडीत काढू गर्व
संकट पळवू क्षणात माते चालून आली अनेक (पृ.9)

विविधता हे वैशिष्ट्य असून जात – पात आणि धर्म आमच्या ध्येयात आडवे येत नाही. हे विश्व आमचे घर आहे, अशी सर्व संतांनी व्यक्त केलेली भावनाही कवी नितांत सुंदरपणे व्यक्त करताना म्हणतात की, संपूर्ण जगात शांतता नांदली पाहिजे, हाच आमचा संदेश आहे. भारतीय संस्कृतीने हाच संदेश जगाला दिला आहे, हेही ते सुचवून जातात

'अपेक्षा' या कवितासंग्रहात कवीने विविध विषयांवर कविता लिहिलेल्या दिसतात. यातील 'ब्रम्हज्ञान' या कवितेत त्यांनी बालमनाचे भावविश्व सुदंरपणे साकारले आहे.

आई माझी छान, धरी माझा कान
सांगे मला ज्ञान, असो अभ्यासात ध्यान (पृ.10)

कुटुंबात संस्कार कशापध्दतीने होतात, हेच सांगताना कवी लिहितात की, ताईची कटकट पाठीमागे असते, म्हणते सारखी पाटी आण आणि पाटीवर काढू पिंपळाचे पान. दादाकडे बघितले तर त्याचे टपोरे डोळे दिसतात. 'गंगेचे खोरे' पाठ कर असे म्हणतो. बाबांना बघितले की गणिताची भर पडते. ते पाढे पाठ करायला लावतात. पाढ्याशिवाय गणिताचे ज्ञान नाही, म्हणतात. या कवितेचा शेवटही खूप मार्मिक आहे.

सर्वोत्तम बरी भोळी माझी आजी
गप्पा गोष्टीवर तिच्या सगळे आम्ही राजी
राग भरे कधी सांगे ब्रम्हणाज्ञान (पृ.10)

'आशिर्वाद' या कवितेतून कवीने आपल्या मुलाला आशीर्वाद देताना

जो उपदेश केला आहे, तो अतिशय हळवा करणारा असला तरी त्यात कणखर असलेला संवदेनशील पिता निसर्गप्रेमी असून आपल्या मुलांवर नैतिक मूल्यांचे संस्कार करणारा आहे. हेच आपल्याला जाणवते.

'आशिर्वाद' कवितेतील पिता आपल्या लहान मुलाला आशीर्वाद देताना म्हणतो की, तू जगाला
मोठा होऊन दाखव, कुळाचे नाव उज्ज्वल

कर. नेहमी सत्याने वाग, कडू प्याला प्राशन करू नको, निसर्ग ही खरी दैवी शक्ती असून कुणाच्याही भूलथापांना बळी पडू नको. डोंगर दुरून चांगला दिसतो, पण जवळ जाऊन पाहताच दऱ्या दिसतात. सुंदर म्हटले तरी पऱ्या ह्या काही खऱ्या नसतात. डोळे सताड उघडे ठेवून चालत जा, असेही ते आपल्या मुलाला

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

आशीर्वाद देताना सांगायला विसरत नाही. म्हणजे जगातील काटे तुला बुडणार नाहीत. हा संवेदनशील पिता सर्वांशी समताभावाने वाग हे सांगायला ही विसरत नाही....

उच्च निच हे भेद इथे ठरले स्वार्थासाठी
समतेचे दर्शन घडवूनी
करी ही पूर्ण मनीषा मोठी (पृ. 11)

अशाप्रकारे समाजात वावरताना निंदा टाकून सर्वांना वंदय झाले पाहिजे, सत्कार्यासाठी झटले पाहिजे. समाजातील दु:खितांचे अश्रू पुसून दीन – दुबळ्यांना आधार दिला पाहिजे, असेही हा पिता आशीर्वाद देताना मुलाला सांगायला विसरत नाही.

'सद्भावना' या कवितेतूनही कवीने जन्मभूमीचे स्तोत्र गायले आहे.

धन्य जननी जन्मभूमी
जिथे जन्मलो वाढलो मी
ऋण तुमचे फेडू कैसे
गुण वर्णु कैसे कैसे .... (पृ. 12)

भूमातेच्या उदरातील पाणी जणू अमृत असून पंचमहाभूतेही थोर आहेत. आई – वडील दोघेही भूमातेप्रमाणे असून सर्व जगाला सुंदर करा, अशी शिकवण ते देतात, हे सांगायला कवी विसरत नाही. असे असूनही सर्वत्र जगात स्वार्थ भरला आहे. काही लोक इतरांना दु:ख देतात. परंतु कुणीही कुणाला नुकसान पोहचवू नये म्हणून मी ही गृहरक्षक झालो आहे, भूमातेचे, समाजाचे रक्षण करण्याचे व्रत घेतले आहे, हेच इथे कवीला सुचवायचे आहे.

सामाजिक, राष्ट्रीय एकात्मतेसाठी कवीची धावपळ सुरू असून त्यांनी 'सतर्क' या कवितेतून या भावना अतिशय सुंदरपणे रेखाटल्या आहेत. केवळ निसर्गच नाही तर अवती – भवतीचे वातावरण केव्हा बदलेल सांगता येत नाही, म्हणून सर्वांनी सतर्क राहिले पाहिजे, वादळाची चाहूल जाणून सर्वांनी अखंड सावधान राहिले पाहिजे, कारण समाजात कोण – केव्हा कसा इतरांशी वाईट वागेल हे सांगता येत नाही.

निसर्गात भर उन्हाळ्यात अवकाळी पाऊस येताना कधीकधी वीज चमकते तसे लोकातील मायेचा ओलावा आटला असून काहींच्या वाट्याला दु:ख येताना ऐन दिवाळीत होळी व्हावी, असे वाईट प्रसंग अनेकांच्या वाट्याला येतात, हे ते सहज सांगून जाताना पुढे लिहितात की,

कोण आप – पर भोपळा भ्रमाचा
फोडा शोध लावा खऱ्या खोट्याचा
समय कठीण दुरावल्या मना
जोडा अविलंब विनंती ही जना (पृ.13)

शेवटी कवी आर्त – व्याकूळ होऊन म्हणतो की, सुख – शांतीचे पीक वाया जाऊ नये, समाजातील अशांततेची झळ बसल्यामुळे जीवाला चुटपूट लागली आहे. लोकांनी चैन करणे सोडून द्यावे, अन्यथा मरगळ येते. समाजात एकात्मता प्रस्थापित झाली पाहिजे, हीच कवीची धडपड आहे, हेही ते तितक्याच व्याकूळपणे लिहितात ....

आपल्या समाजातील भेदभाव, विषमतेवर कवीने अत्यंत कठोरपणे प्रहार केला आहे. 'विषमता' या कवितेत ते लिहितात,

विचित्र हे रूप न आमुचे
मनही निर्मल जलगंगेचे
मग पिशाच्च हे भेदभावाचे
का ? लागते पाठी आमचे ? (पृ. 14)

'आपल्या तो बाळ्या आणि लोकाचं ते कारटं' या लोकोक्तीचा उपयोग करून कवी म्हणतात की, तुम्ही जर रेघोट्याही ओढल्या तरी ते 'ललित साहित्य' ठरते आणि आम्ही सत्य लिहिले तरी 'दलित साहित्य' होते, ही खंतही ते व्यक्त करतात. आपल्या मनातील शल्य व्यक्त करताना ते लिहितात,

कुणी का लावला वशिला?
दिली का लाच विधात्याला?
व्यर्थ हा जन्म असे त्यांचा
अव्हेर जे करिती साम्याचा (पृ. 14)

समाजातील अपंग, दिव्यांग, बंधू – भगिनींचे दुःख कवीने 'अपंगीता' या कवितेत मोठ्या मार्मिकपणे मांडले आहे, ते मुळातून वाचण्यासारखे आहे.

मना विचारा काय वाटले
असते अपंग तुम्ही
काय वदाव्या व्यथा
आम्हाला जाळती ज्या अंतरी (पृ. 16)

एखादा दृष्टीहीन सृष्टी पाहण्यासाठी तडफडतो, कुणाला दूर
दूर जावेसे वाटते पण त्यांना पायच नसतात. आपण अपंग – दिव्यांग आहोत म्हणून दुःखी – कष्टी होऊन विहिरीत जीव द्यावा वाटतो, कधी खूप मधुर बोल बोलावेसे वाटतात, पण मुकेपणामुळे बोलता येत नाही. कधी एखाद्याला सुस्वर संगीत ऐकावे वाटते, पण बहिरेपणामुळे ऐकता येत नाही. असे अपंगत्वाचे दुःख कवीने मोठ्या तरलपणे मांडले आहे. शेवटी ते लिहितात ...

हावभावावर जगते जीवन
नोंदाव्या कुठे तक्रारी (पृ. 16)

समाजातील भिकाऱ्यांचे दुःखही कवीने फार संवेदनशीलपणे चितारले आहे. हे खूप व्याकूळ करणारे आहे.

असे झोपडीत माझा बाळ हो भुकेला
भिक नका घालू मजला
काम द्या भिकेला (पृ. 19)

बाळाला ताप आला आहे, तो घरी एकटाच असून माशासारखा तळमळत आहे. मजुरी करून मी त्याला पिठाचं पाणी पाजीन, पण तुम्ही माझ्या पोटच्या गोळ्याला अंतरू नका. मला भीक नको, काहीतरी काम द्या. असे ही याचक विनवते आहे त्या मुलाचे पित्याचे छत्र हरविल्यामुळे त्याची आईच त्याची पाखर झाली असून

तिचा पदर फाटला आहे.घाम गाळून त्या श्रमाच्या आनंदाने पान्हा फुटल्यानंतर त्याला दूध पाजीन, असे म्हणून ती अत्यंत स्वाभिमानाने हाताला काम द्या, अशी विनवणी करताना दिसते.

सरकारी योजना सामान्य माणसांच्या हितासाठी असतात. परंतु सरकारी कचेरीतील काही व्यक्ती, काही इतर व्यक्ती या योजनेचा पूर्ण लाभ सामान्य माणसाला कसा पूर्णपणे मिळू देत नाही. दोष मात्र शासनावर जातो. सामान्य माणूस कसा ठगवला जातो, याचे चित्रण कवीने 'घरकुल' कवितेमध्ये केले आहे. सामान्य माणसाला कसे बसे भ्रष्ट आचरणानंतर घरकुल मिळते पण तिथे बाहेर झोकाही बांधता नाही, अशी खंत व्यक्त करतांना कवी लिहितात की,..

घर गाळ्याचे उद्घाटन होई
बघुनी घर बाहेरी
झोकाही तिथे बांधता न येई
हे बघा जाऊनी अंतरी
योजना सफल करी नंतरी (पृ. 20)

'बाळूतं' या कवितेत कवीने घरच्या गरिबीचे चित्र रेखाटून समाजातील गरीब, शोषीत, पिडीत लोक कसे अभावाचे जीवन जगतात, हे मांडले आहे. अशा गरिबीतही ही माणसे मुलांना केवळ सुखच देण्याचा प्रयत्न करतात त्यांचे वर्णन करून समाजातील सावकार, श्रीमंत लोक गरिबांना कसे छळतात याचेही व्याकूळ करणारे दर्शन घडवले आहे. परंतु अशा गरिबीतही मुलांना कसे सुख देण्याचा प्रयत्न केला हे सांगताना कवी लिहितात,

फाटकी साडी चोळी, दावी लाजचं ठिगळ
उन्हाळ्यात जळे तन पेटे तणाची झोपडी
हिवाळ्यात अंग बर्फ पावसाळी होई होडी
नाही वाहू दिले तुला दु:खाश्रूच्या रे पुरात (पृ.21)

महागाईचे चटके गरिबाला आणि मजूर लोकांना कसे त्रस्त करतात, याचे चित्रण कवीने 'सुख लोपलं' या कवितेमध्ये केले आहे.

जळो जळो महागाई भाव भिडले आभाळी
जाळ लागेना चुलीला आग लागली पोटाला (पृ. 22)

घरात खाणारी अनेक तोंड आहेत पण नोकरी कुणीच करीत नाही. सगळेच मजुरीचे धनी आहेत पण हाताला कामच नाही! घरात पोरंबाळं भुकेनं हडकून गेली आहेत. बाहेर टप्पर वेचून आणतात. घरात अठरा विश्वे दारिद्र्य आहे. अशा कठीण परिस्थितीत –

नाही भेटत भाकर आम्हा कोठली साखर
त्यात शिकून बेकार कुठं मांडावी तक्रार (पृ. 22)

सरकारला फक्त खुर्चीचीच फिकीर असते, फक्त घोषणाच करतात, महागाईमुळे तेलाचा वापर कमी करावा लागतो, कुठे सीमेचे भांडण आहे, तर कुठे धर्मांचे तांडव आहे. अयोध्येत शांती नाही, लंकाही पेटली आहे. अशा भयावह परिस्थितीत कसे जगावे, याची चिंता कवीला भेडसावते.

असती घरचेही जळून, बसले शेजारी टपून

सुख लोपलं लोपलं झोप लागेना डोळ्याला (पृ. 22)

समाजात महिलांनीही फॅशनचे वेड सोडून नैतिक मूल्यांची कास धरावी, असे आवाहन कधी 'समझोता' कवितेतून करतात. तर श्रावणातल्या रम्य वातावरणात भूमातेने हिरवा शालू पांघरल्याचे सुंदर निसर्ग चित्रण त्यांनी 'जीवनकळा' या कवितेतून साकारले आहे.

सगे सोयरे ओहळ नाले
स्वागत भगिनी गंगा करते
मिरविती भेटती सरोवराते
होती विसर्जित सागराच्या उरी (पृ. 25)

जगताना भय वाटते, अशी परिस्थिती अवतीभवती आहे. सर्वत्र समस्या प्रश्नांचे रण माजले असतांना या समस्या तुम्हा – आम्हाला म्हणजे समाजाला एकत्र येऊनच सोडवाव्या लागतील, असे आवाहन कवीने 'साद' कवितेतून समाजाला केले आहे, ते वाखाणण्यासारखे आहे. समाजाला 'औषध नसलेला रोग' झाला आहे. महागाई, भ्रष्टाचार, लाचलुचपत हे त्याचे नाव असून या रोगावर कुठलेच औषध नाही, ही खंतही त्यांनी व्यक्त केली आहे. या व्यतिरिक्त प्रीती विषयावरील कविताही या कवितासंग्रह आहेत. 'नाही' म्हणून माझ्या मनाला दुखवू नको, अशी आळवणीही प्रियेला ते करतात, याचे मनोहर चित्रण 'मधुकुंभ' कवितेत आले आहे.

मानवा, तू व्यर्थ शिणू नको स्वजनांचे हित जाणून घेऊन सतत चालत राहून इतरांनाही , मार्ग दाखव, असे आवाहनही ते 'चेतावणी' कवितेतून करतात.

सारांश, अशाप्रकारे मानवी जीवनाला व्यापून उरणाऱ्या विविध कविता आपल्याला कवी ज्ञानदास काळे गुरूजी यांच्या 'अपेक्षा' या कवितासंग्रहात भेटतात. आपल्या अपेक्षांची पूर्तीही ह्या कविता करतात. अत्यंत सकस, गुणावत्तापूर्ण विषयांना मांडताना आशय आणि अभिव्यक्तीचा सुरेख संगम त्यांनी साधला आहे. अर्थात शुध्दलेखनाच्या अनुषंगाने पाहिल्यास काही चुका दिसतात, परंतु त्यामुळे रसविघ्न फारसे होत नाही, हे दिलासादायक आहे. विस्तारभयास्तव या शोधनिबंधात काही निवडक कवितांचा आधार घेऊन मांडणी केली आहे. एकूणच रसिक, वाचक, समीक्षकांची 'अपेक्षा' पूर्ती करणारा हा कवितासंग्रह असून हा कवी मात्र काहीसा दुर्लक्षित राहिला आहे. हे मात्र वेदनादायी आहे.

- अपेक्षा (कवितासंग्रह)

  कवी – ज्ञानदास काळे, निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथमावृती – विजयादशमी, 24 ऑक्टोबर 1993

- संदर्भ

1. काळे ज्ञानदास, मनोगत, अपेक्षा (कवितासंग्रह),निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती 24,ऑक्टोबर 1993
2. कुलकर्णी प्रा.रा.कृ., प्रस्तावना, अपेक्षा (कवितासंग्रह), निर्मल प्रकाशन, नांदेड प्रथमावृत्ती – 24 ऑक्टोबर 1993
3. भगत प्रा. दत्ता, ब्लर्बवरून, अपेक्षा (कवितासंग्रह), निर्मल प्रकाशन, नांदेड प्रथमावृत्ती – 24 ऑक्टोबर 1993